# राज्यातील हवामान, रब्बी हंगाम व उन्हाळी हंगाम २०१९-२० पिक पेरणी, पिक परिस्थितीचा दिनांक ०९/०३/२०२० अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** – राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. दि.०१ ते ०२ मार्च, २०२० च्या दरम्यान बहुतांश विभागात अवकाळी पावसाची नोंद झाली. सप्ताहाच्या उत्तरार्धात कोंकण, नाशिक व पुणे विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली तसेच कोल्हापूर, औरंगाबाद व लातूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम तर अमरावती व नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

दि.०६.०३.२०२० अखेरच्या अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राबाबतच्या नजरअंदाजित प्राथमिक अहवालानुसार दि.०१ मार्च, २०२० ते दि.०३ मार्च, २०२० रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे राज्यात शेतीपिक/फळपिकांचे १०,५१४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. बाधित पिकांमध्ये प्रामुख्याने गहू,मका,बाजरी, हरभरा, ज्वारी, द्राक्ष, हळद, मीरची, संत्रा, मोसंबी, केळी, भाजीपाला व कांदा या पिकांचा समावेश आहे.

**रब्बी हंगाम २०१९-२०**- राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६.९३ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ५९.४० लाख हेक्टर क्षेत्रावर (१०४%) पेरणी झाली आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. हरभरा घाटे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंबीमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणी सुरू आहे. करडई पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत आहे. तर मका पिक कणसे लागणे, दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**सन-२०१९-२० चे रब्बी हंगाम पेरणी क्षेत्राची सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता**




**रब्बी हंगाम किड व रोग** - निरंक.

**उन्हाळी हंगाम २०२०**- राज्यात दि.९मार्च, २०२० अखेर १.२० लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. राज्यात कोल्हापूर विभागात उन्हाळी भात पिकाची रोपे लागणीची कामे पुर्णत्वाकडे असून नागपूर विभागात उन्हाळी भात पिकाची पेरणीची कामे झालेली आहेत. इतर विभागात उन्हाळी पिकाच्या पेरणीसाठी मशागतीची  व पेरणीची कामे सुरु आहेत.

## सन-२०१९-२० चे उन्हाळी हंगाम पेरणी क्षेत्राची सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच सप्ताहाच्या उत्तरार्धात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०** - विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ०.४१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३८%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांची कापणी झालेल्या व ओलावा असलेल्या क्षेत्रात पिकांच्या पेरणीची कामे झाली आहेत. कडधान्ये पिके शेंगा/घाटे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** निरंक

**उन्हाळी हंगाम २०२०-** विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.०५४ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे.

**नाशिक विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.३१ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ५.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३३%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिकाची काढणी अंतिम टप्प्यात आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या भरणे ते निसवणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे. तेलबिया पिके वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** निरंक

**उन्हाळी हंगाम २०२०-** विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.२८ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. उन्हाळी पिके वाढीच्या अवस्थेत आहे.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.८१ लाख हेक्टर दि.९ मार्च, २०२० अखेर १२.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (६८%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक दाणे भरणे, पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. मका पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. हरभरा पिक घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. सुरु ऊसाची लागवड चालू आहे.

**किड व रोग-** निरंक

**उन्हाळी हंगाम २०२०-** विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.०६३ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. विभागात भुईमूग, बाजरी व सुर्यफुल पिकांची वाढ चांगली आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०७ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ४.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. हरभरा पिक घाटे भरणे, पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. ज्वारी दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. मका पिक फुलोरा, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. पुर्व हंगामी ऊस वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत तर सुरु ऊसाची लागवड पुर्णत्वाकडे आहे. करडई पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम २०१९-२०-** विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.०७६ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी सुरु आहे. भात रोपे लागणीची कामे पुर्णत्वाकडे असून, फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत. वैशाखी मूग, मका व भुईमूग पिकाच्या पेरण्या सुरु आहेत. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** निरंक

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.७२ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ९.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२६%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक घाटे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंबीमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक कणसे भरणे ते काढणीच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** निरंक

**उन्हाळी हंगाम २०१९-२०-** विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.०६९ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी सुरु आहे. उन्हाळी भुईमूग, बाजरी व मका पेरणी झाली असून, पिक उगवणीच्या अवस्थेत आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ११.१४ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर १४.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३१%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत. गहू पिक ओंब्या पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत. हरभरा पिक घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. करडई पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- निरंक

**उन्हाळी हंगाम २०१९-२०**- विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी सुरु आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४७ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ८.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२५%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक घाटे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. गहू पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- निरंक

**उन्हाळी हंगाम २०१९-२०**- विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.०४७ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी सुरु आहे.

**नागपूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. सप्ताहाच्या उत्तरार्धात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१२ लाख हेक्टर असून दि.९ मार्च, २०२० अखेर ४.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक पक्वतेच्या ते कापणीच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे घाटे भरणे तर काही ठिकाणी काढणीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- निरंक

**उन्हाळी हंगाम २०२०**- विभागात दि.९ मार्च, २०२० अखेर ०.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी भात पिकाची पेरणी झालेली आहे. तसेच इतर पिकांसाठी मशागतीची कामे सुरु आहेत.

| महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०१९-२० मुख्य पिकाखालील दि. ०९.०३.२०२० पर्यंतचा पेरणीचा साप्ताहीक प्रगती अहवाल. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | (क्षेत्र हेक्टर मध्ये) |
| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (१२-१३ ते १६-१७) | मागिल वर्षाची पेरणी दि ०२/०३/२०१९ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
| १ | रब्बी ज्वारी | २६७८५१३ | १२४६३४२ | १९०४९१० | ७१ | १५३ |
| २ | गहू | १०१४८०४ | ५६९२७२ | १२४२१२६ | १२२ | २१८ |
| ३ | मका | २२५२६० | ११५४१९ | ३००३४९ | १३३ | २६० |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १२४६२ | १३०३३ | १०८०६ | ८७ | ८३ |
| | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३९३१०३९** | **१९४४०६५** | **३४५८१९१** | **८८** | **१७८** |
| ५ | हरभरा | १४९०२४७ | १२९२७८७ | २३०८१४५ | १५५ | १७९ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०९९८६ | १०९६८४ | १३१५९९ | १२० | १२० |
| | **एकूण रब्बी कडधान्ये** | **१६००२३३** | **१४०२४७१** | **२४३९७४४** | **१५२** | **१७४** |
| | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५५३१२७१** | **३३४६५३६** | **५८९७९३५** | **१०७** | **१७६** |
| ७ | करडई | ८७६०४ | १८००० | १९०३३ | २२ | १०६ |
| ८ | जवस | २१५०४ | ७६१८ | ८६९४ | ४० | ११४ |
| ९ | तीळ | १४५२ | ५०८ | ६१४ | ४२ | १२१ |
| १० | सुर्यफुल | ४१६३२ | ३५२४ | २७८२ | ७ | ७९ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | ९६०१ | ५७४३ | १०६७० | १११ | १८६ |
| | **एकूण रब्बी तेलबीया** | **१६१७९३** | **३५३९३** | **४१७९३** | **२६** | **११८** |
| | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५६९३०६५** | **३३८१९२९** | **५९३९७२७** | **१०४.३३** | **१७६** |
| | टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित | | | | | |

| महाराष्ट्र राज्यातील उन्हाळी हंगामातील मुख्य पिकाखालील दि ०९.०३.२०२० अखेर पेरणी अहवाल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | (क्षेत्र हेक्टर मध्ये) | |
| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र | मागिल वर्षाची पेरणी दि. ०७/०३/२०१९ | प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागील वर्षाशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागील वर्षाशी तुलना |
| १ | उन्हाळी भात | ३३९८४ | ३१३४८ | ४७२९० | १३९ | १५१ | ५१ |
| २ | उन्हाळी मका | २४६९९ | ७७५० | २१५१० | ८७ | २७८ | १७८ |
| ३ | इतर तृणधान्य | १८२५९ | ३००० | १७३३८ | ९५ | ५७८ | ४७८ |
| | **एकुण तृणधान्य** | **७६९४२** | **४२०९८** | **८६१३८** | **११२** | **२०५** | **१०५** |
| **4** | **इतर कडधान्य** | **४१९०** | **५६४** | **२३७६** | **५७** | **४२१** | **३२१** |
| | **एकुण कडधान्य** | **४१९०** | **५६४** | **२३७६** | **५७** | **४२१** | **३२१** |
| **5** | उन्हाळी भुईमुग | ८२२४४ | ९६३४ | ३०८७७ | ३८ | ३२१ | २२१ |
| **6** | उन्हाळी सुर्यफुल | ४३९८ | १५७ | १८४ | ४ | ११७ | १७ |
| **7** | उन्हाळी तीळ | ० | ३८८ | ३६४ | #DIV/0! | ९४ | -६ |
| **8** | ईतर गळीतधान्य | ० | ८५ | १५३ | #DIV/0! | १८० | ८० |
| | **एकुण गळीतधान्य** | **८६६४२** | **१०२६४** | **३१५७८** | **३६** | **३०८** | **२०८** |
| | **एकुण उन्हाळी पिके** | **१६७७७३** | **५२९२६** | **१२००९२** | **७२** | **२२७** | **१२७** |
| | टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत | | | | | | |